**पंतप्रधानांनी जय श्री महा बोधी मंदिराला दिली भेट (06 एप्रिल 2025)**

06 एप्रिल 2025

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी, श्रीलंकेचे राष्ट्रपती, महामहिम अनुरा कुमारा दिसनायके यांच्यासह, अनुराधापुरा मधील पवित्र जय श्री महा बोधी मंदिराला भेट दिली आणि गौरवशाली महाबोधी वृक्षाजवळ प्रार्थना केली.

2. या वृक्षाची वाढ बो रोपापासून झाल्याचे मानले जाते, जे भारतातून इ.स.पूर्व 3 ऱ्या शतकात संगमित्ता महा थेरि यांच्या कडून श्रीलंकेत आणण्यात आले होते. हे मंदिर भारत-श्रीलंका यांच्यातील घनिष्ठ भागीदारीचा पाया असलेल्या दृढ सांस्कृतिक संबंधाचे प्रतीक आहे.

अनुराधापुरा

06 एप्रिल 2025